MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी मर्यादित.

(CIN NO:U40109MH2005SGC153646)

अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय,
अति उच्च दाब प्रकल्प मंडळ, महापारेषण, अमरावती.
**कार्यालयाचा पत्ता:** विंग-A, दुसरा माळा, प्रकाश्सरिता प्रशासकीय इमारत, २२० केव्ही, उपकेंद्र परिसर, मोर्शी रोड, अमरावती-४४४६०३.
Email Id: se1600@mahatransco.in

संदर्भ क्र. अ.अ./अ.ऊ.दा./प्रकल्प/मंडळ/अम/तांत्रिक/ No – 591 दिनांक: 23 AUG 2023

## सुचना

महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनीच्या अति उच्च दाब प्रकल्प मंडळ, अमरावती कार्यालयामधे वर्ष २०२३-२४ करिता बाह्यस्त्रोत पद्धतीने कंत्राटी कामगार (शिपाई) नियुक्त करण्याकरिता, **अमरावती जिल्ह्यातील** बेरोजगारांनी स्थापन केलेल्या नोंदणीकृत सेवा सहकारी संस्थांकडून खालील अटी व शर्तीवर अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अटी व शर्ती:**

१. संस्थेने अर्ज सदर करतांना अर्जासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे –
   अ) अर्ज सादर करणाऱ्या संस्थेचे संपूर्ण नाव, संपूर्ण पत्ता, ई-मेल व दूरध्वनी क्रमांक.
   आ) ठेकेदाराचे नाव, त्याचा कायमस्वरूपी पत्ता व रहिवाशी दाखला.
   इ) सुशिक्षित बेरोजगार संस्थेचे नोंदणी पत्र.
   ई) कंत्राटी कामगार पुरविण्याचा परवाना.
   उ) कामगार राज्य विमा योजनेचा कोड नंबर.
   ऊ) भविष्य निर्वाह निधीचा नोंदणी क्रमांक व कोड नंबर.
   ऋ) व्यवसाय कर क्रमांक.
   ऌ) GST क्रमांक.
   ऍ) मुंबई दुकाने व अस्थापन अधिनियम क्र. १९४८ अंतर्गत व्यवसाय परवाना.
   ऐ) कंत्राटदार संस्थेचे बँकेचे नाव, पत्ता, खाते क्रमांक व PAN क्रमांक.
२. महाराष्ट्र शासनाचे उपसचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय यांनी दि. २८.०९.२०१० च्या महाराष्ट्र शासन राजपत्र-१ मध्ये प्रसिद्ध केलेल्या शुद्धीपात्राकानुसार किमान वेतन दर, तसेच कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयातर्फे वेळोवेळी निर्गमित होणार्या परिपत्रकाप्रमाणे विशेष भत्ते आणि महापारेषण कंपनीच्या परिपत्रक क्र. १४२ दि.०३.०१.२०१४ प्रमाणे किमान अधिभार समाविष्ट करून आलेल्या दारावरच कंत्राटी कामगार पुरविण्याचे हमीपत्र संस्थेस द्यावे लागेल.
३. संस्थेस महापारेषण कंपनीच्या परिपत्रक क्र. १४२ दि. ०३.०१.२०१४ मधील सूचनांचे तंतोतंत पालन करावे लागेल.
४. कुशल, अर्धकुशल व अकुशल कामगारांच्या व्याख्या महापारेषण परिपत्रक क्र.१४२ दि. ०३.०१.२०१४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे असतील.
५. वर्ष २०२३-२४ करिता बह्यास्त्रोत पद्धतीने कंत्राटी कामगार नियुक्त करण्याच्या पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे –

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | शिपाई (अकुशल) | एकुण |
|---|---|---|---|
| १ | अति उच्च दाब प्रकल्प मंडळ कार्यालय, अमरावती | ०१ | ०१ |

वरीलप्रमाणे अटी व शर्तीची पूर्तता करून भरलेले अर्ज अति उच्च दाब प्रकल्प मंडळ कार्यालय, अमरावती येथे दि. ३०.०८.२०२३, सायंकाळी ०५:०० पर्यंत (शनिवार, रविवार व सुट्टीचे दिवस सोडून) स्वीकारण्यात येतील. दि. ३०.०८.२०२३, सायंकाळी ०५:०० नंतर अर्जांचा प्रत्यक्ष कामवाटपात विचार केल्या जाणार नाही, याची कृपया नोंद घेण्यात यावी. एकापेक्षा अधिक संस्थांचे अर्ज विहित कालमर्यादेत प्राप्त झाल्यास लॉटरी पद्धतीने कामाचे वाटप करण्यात येईल. महापारेषण कंपनीचे परिपत्रक क्र. १४२ दि.०३.०१.२०१४ उच्च दाब प्रकल्प मंडळ कार्यालय, अमरावती येथे संदभार्थ उपलब्ध आहे.

अधीक्षक अभियंता
अति उच्च दाब प्रकल्प मंडळ,
महापारेषण, अमरावती